| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | १५/०२/२०२३ |
| नोंदणी दिनांक | : | १५/०२/२०२३ |
| निकाल दिनांक | : | ०९/०४/२०२६ |
| कालावधी | : | वर्षे महिने दिवस<br>०३ ०१ २५ |

**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ६२/२०२३ मधील न्यायनिर्णय</u>**

**(निशाणी क्र. १५ लगत )**

**फौजदारी नियमावलीचे प्रकरण XXXIII मधील नमुना क्र.XXXII प्रमाणे**

**भाग–'अ'**

**(न्यायनिर्णयाचे मुखपृष्ठ)**

[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (I)]

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, दोंडाईचा यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी श्री. आदित्य घ. नाईक)**

**निकाल तारीख ०९/०४/२०२६**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ६२/२०२३**

**सीएनआर क्र. एमएचडीएच ०४०००१७८२०२३**

**(अपराध क्र. ४५२/२०२२, दोंडाईचा पोलीस ठाणे)**

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र राज्य,<br>तर्फे प्रभारी अधिकारी,<br>दोंडाईचा पोलीस ठाणे,<br>ता. शिंदखेडा, जि. धुळे |
| **सरकार तर्फे विद्वान वकील** | | सहा.सरकारी अभियोक्ता श्री. जे. एस. गंगावणे |

| | | |
|---|---|---|
| **आरोपी** | | संदिप अशोक पाटील,<br>वय–२४ वर्षे, व्यवसाय– विदेशी दारु विकणे,<br>रा. विखरण, ता. शिंदखेडा, जि. धुळे. |
| **आरोपीतर्फे विद्वान वकील** | | ॲड. श्री. जे. व्ही. तायडे |

**भाग–'ब'**

[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii)]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ३०/१२/२०२२ |
| प्रथम खबर अहवालाचा दिनांक | ३०/१२/२०२२ |
| दोषारोप–पत्र दाखल झाल्याचा दिनांक | १५/०२/२०२३ |
| अपराधाचा तपशिल सांगीतल्याचा दिनांक | ०९/०९/२०२५ |
| पुरावा आरंभ झाल्याचा दिनांक | ०९/०३/२०२६ |
| प्रकरण न्यायनिर्णयाकरीता राखुन ठेवल्याचा दिनांक | ०९/०४/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०९/०४/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक, असल्यास | — |

**आरोपीचा तपशील**

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जमानतीवर सोडल्याचा दिनांक | दोषारोपामधील कलमे | दोषमुक्ती किंवा दोषसिद्धी | देण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.सं. चे कलम ४२८ करीता आरोपीने भोगलेल्या स्थानबद्धतेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संदिप अशोक | | १५.०२.२०२३ | महाराष्ट्र दारु बंदी | निर्दोष मुक्त | — | — |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पाटील | | | अधिनियम कलम ६५–ई प्रमाणे. | | | |

**भाग–'क'**

[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii)]

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ) अभियोग पक्ष :–**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | नदीम युसुफ शेख | घटनास्थळ पंचनाम्याचे पंच | १५ लगत |
| २. | अनिल दादाभाई धनगर | फिर्यादी | १५ लगत |

**ब) बचाव पक्ष, असल्यास :–**

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

**क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :–**

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन कागदपत्रांची/निशाणींची यादी**

**अ) अभियोग पक्ष :–**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| १. | २२ | पंचनाम्यावरील पंच साक्षीदार क्र. १ ची सही |
| २. | २४ | फिर्याद |

**ब) <u>बचाव पक्ष</u> :–**

| **अ.क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशिल** |
|---|---|---|
| – | – | – |

**क) <u>न्यायालयीन</u> :–**

| **अ.क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशिल** |
|---|---|---|
| – | – | – |

**ड) <u>भौतिक वस्तु</u> :–**

| **अ.क्र.** | **भौतिक वस्तु क्र.** | **तपशिल** |
|---|---|---|
| | | |

## न्यायनिर्णय

(पारित दिनांकः ०९/०४/२०२६)

आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयांकरीता संपरिक्षेचा सामना केला आहे.

०२. आरोपीला नि.क्र.१५ अन्वये गुन्हयाचा तपशील स्पष्ट करुन त्याचे प्रतिकथन नोंदविण्यात आले. आरोपीने गुन्हा नाकबूल करुन संपरिक्षा घेण्याची विनंती केली.

०३. प्रस्तुत खटल्यामध्ये न्यायनिर्णय करीत असताना, माझे विचारार्थ निघालेले मुद्दे आणि त्यांचेवरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे :–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्ष हे सिध्द करतो का की, दिनांक ३०.१२.२०२२ रोजी १८.३० वाजण्याच्या सुमारास मौजे विखरण गावात महालक्ष्मी हॉटेलच्यासमोर एका घराच्या आडोश्याला सार्वजनीक जागी, आरोपी स्वतःच्या फायदयासाठी विनापास परवाना प्रतिबंधीत माल म्हणजेच विदेशी दारु बेकायदेशीर रित्या स्वतःच्या कब्जात विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगतांना मिळुन आला आणि त्यायोगे त्याने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५(ई) नुसार गुन्हा केला आहे ? | नाही. |
| २) | अंतिम आदेश काय ? | आरोपीला निर्दोष मुक्त करणेत येते. |

## कारणमिमांसा

०४. अभियोग पक्ष हा भाग–'क' मध्ये नमुद केल्याप्रमाणे तोंडी व कागदोपत्री असलेल्या पुराव्यावर अवलंबुन राहीला आहे. आरोपीचे फौ.प्र.सं. कलम ३१३ (१)(ब) प्रमाणे निवेदन नि. क्र. २६ अन्वये नोंदविण्यात आलेले आहे. त्यामध्ये, त्याने अभियोग पक्षाचा पुरावा नाकारुन त्याचे विरुध्द खोटा खटला दाखल केल्याचा बचाव घेतला आहे. आरोपीने त्याच्या बचावार्थ कोणताही पुरावा सादर केलेला नाही.

०५. अभियोग पक्षातर्फे विव्दान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. जे. एस. गंगावणे यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच आरोपीतर्फे विव्दान विधीज्ञ श्री. जे. व्ही. तायडे यांचा युक्तीवाद ऐकला.

## मुद्दा क्र.१ करीता :-

०६. अभियोग पक्षाने आरोपी हा त्याच्या ताब्यात बेकायदेशीररित्या व विनापरवाना प्रतिबंधीत दारु विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगून होता हे सिध्द करणे आवश्यक आहे.

०७. फिर्यादी (सा.क्र.२) याने त्याच्या सरतपासात असे कथन केले आहे की, दि. ३०.१२.२०२२ ते दोंडाईचा पोलीस स्टेशन येथे पोकॉ. या पदावर कार्यरत होते. त्यादिवशी पोलीस स्टेशन येथे ते, पोसई शरद लेंडे, पोना. प्रेमराज पाटील व पोकॉ. हिरालाल सुर्यवंशी असे हजर होतो. त्यावेळेस पोनि. दुर्गेश तिवारी यांना गुप्त बातमी मिळाली की, विखरण येथे हॉटेल महालक्ष्मी मागे एक इसम देशी व विदेशी दारुची चोरटी विक्री करतो. त्यावर पोऊनि. शरद लेंडे यांनी दोन पंचाना बोलावुन बातमीची हकीकत सांगितली. त्यावर ते दोघे पंच म्हणुन येण्यास तयार झाले. त्यावर ते सरकारी वाहनाने दोंडाईचा येथुन विखरण गावाकडे रवाना झाले. फिर्यादीच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यानंतर विखरण गावाच्या अलीकडे त्यांनी त्यांचे सरकारी वाहन थांबवुन बातमीच्या ठिकाणी पायी गेले. त्याठिकाणी तेथे एक इसम पांढरी पिशवी घेवुन त्यांना दिसुन आला. त्यांना बातमीची खात्री झाल्याने त्यांनी तेथे छापा टाकला. त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव संदिप अशोक पाटील असे सांगितले. फिर्यादीच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्याच्या कब्ज्यातील मुद्देमाल म्हणजेच ऑफीसर्स चॉईसच्या १८० मि.ली. मापाच्या ५ बाटल्या त्यांनी जप्त केल्या. त्यातुन एक बाटली नमुन्याकरीता सिलबंद केली. तसेच उर्वरित मुद्देमाल पोलीस स्टेशन येथे जमा केला. त्यानंतर त्याने दोंडाईचा पोलीस ठाणे येथे आरोपीविरुध्द रितसर फिर्याद दाखल केली. फिर्यादी (सा.क्र.२) यांच्या तोंडी पुराव्यास फिर्याद (नि.क्र.२४) मधील कथने पुष्टी देतात.

०८. नदीम (सा.क्र.१) या अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या एकमेव पंच साक्षीदाराने मात्र त्याचे पुराव्यादरम्यान अभियोग पक्षाला मदत होईल अशी साक्ष दिलेली नाही. सदर पंच साक्षीदार हा अभियोग पक्षाला सहकार्य करीत नसल्याने विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या परवानगीने त्याला उलटतपासास्वरुप प्रश्न विचारले. परंतु, त्यायोगे देखील अभियोग पक्षाच्या हकिकतीस पुष्टी देणारा असा कोणताही पुरावा अभियोग पक्षाला अभिलेखावर आणता आलेला नाही.

०९. फिर्यादी (सा.क्र.२) ने अभियोग पक्षाच्या हकिकतीस मदत होईल अशी साक्ष दिल्याचे वरील पुराव्यावरुन स्पष्ट होते. परंतु, नदीम (सा.क्र.१) या पंच साक्षीदाराने अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या एकमेव पंच साक्षीदाराने अभियोग पक्षाला सहकार्य केलेले नाही. त्याच्या पुराव्यामध्ये आरोपीचा प्रस्तुत गुन्हयाशी कोणताही संबंध आहे हे दर्शविणारी तथ्ये शाबीत झालेली नाहीत. प्रस्तुत खटल्यातील घटनास्थळ–नि–जप्ती पंचनामा शाबीत झालेला नाही. त्यामुळे, आरोपीचे विरुध्द त्याचे ताब्यातून पंचांसमक्ष प्रतिबंधीत मद्य जप्त झाली होती असा निष्कर्ष काढणे रास्त होणारे नाही. सबब, प्राप्त परिस्थितीमध्ये अभियोग पक्षाने केलेल्या आरोपाप्रमाणे खरोखरीच आरोपीच्या ताब्यातून वरील वर्णनाची विदेशी दारु मिळून आली होती व ती पंचांसमक्ष जप्त झालेली होती, ही बाब ठोस पुराव्यानिशी सिध्द झालेली नाही. केवळ पोलीस कर्मचारी असलेल्या फिर्यादी (सा.क्र.२) याच्या तोंडी पुराव्यावर विसंबून राहून तसा निष्कर्ष काढणे न्यायोचित होणार नाही.

१०. तसेच, येथे हेही नमुद करणे अत्यंत आवश्यक आहे की, प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपीच्या ताब्यातून कथितरित्या जप्त केलेल्या मुद्देमालापैकी प्रत्यंतराकरीता काढून घेण्यात आलेली बाटली ही रासायनिक परिक्षणाकरीता मा.केमिकल ॲनालायझर यांचेकडे पाठविण्यात आलेली होती व ती त्यांना प्राप्त झाली होती असे दर्शविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर सादर करण्यात आलेला नाही. तसेच, सर्वात महत्वाचे म्हणजे सदर मुद्देमालाबाबत रासायनिक परिक्षणाबाबतचा अहवाल अभिलेखावर सादर केलेला नाही. केवळ पोलीस कर्मचारी असलेल्या फिर्यादी याच्या तोंडी पुराव्यावर विसंबून, आरोपीच्या ताब्यातून

कथितरित्या जप्त केलेला मुद्देमाल हा महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम या कायद्याखाली प्रतिबंधीत असलेले मद्य होते, असा निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. सबब, आरोपीच्या ताब्यातून कथितरित्या जप्त केलेला मुद्देमाल हा महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम या कायद्याखालील प्रतिबंधीत मद्य असल्याचे अभियोग पक्षातर्फे ठोस पुराव्यानिशी सिध्द करण्यात आलेले नाही.

११. वरील विवेचनाअंती मी या निष्कर्षाप्रत पोहोचलो आहे की, प्रस्तुत खटल्याचे कामी अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरुन आरोपी याचे ताब्यातून कथितरित्या जप्त झालेला मुद्देमाल हा महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कायद्याखालील निषिध्द मद्य असल्याचे व तो मुद्देमाल आरोपीच्याच ताब्यातून मिळून आल्याचे व जप्त झाल्याचे, कोणत्याही संयुक्तिक शंकेच्या पलीकडे जावून शाबीत करण्यात अभियोग पक्ष अयशस्वी ठरलेला आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

<u>मुद्दा क्र.२ करीता</u> :–

१२. आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेला आरोप सिध्द करण्यात अभियोग पक्ष अयशस्वी ठरल्याकारणाने मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी दिलेले आहे. सबब, आरोपीची या खटल्यातून निर्दोषपणे मुक्तता करणे न्यायोचित होणारे आहे. सबब, मुद्दा क्र.२ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे:–

<u>–: आदेश :–</u>

१. आरोपी संदिप अशोक पाटील याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करणेत येते.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करणेत येते.

३. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल अपीलाकरीताचा कालावधी पूर्ण झालेनंतर अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, धुळे यांचेकडे पुढील कार्यवाहीकरीता पाठविणेत यावा.

४. आरोपी याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) अन्वये, रुपये १५,०००/– इतक्या रक्कमेचा वैयक्तिक मुचलका व तेवढयाच रकमेचा जामीन द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित करण्यात आला.)

ADITYA GHANSHAM NAIK
Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2026.04.09 17:25:34 +0530

स्थळ : दोंडाईचा
दिनांक : ०९/०४/२०२६

(श्री. आदित्य घ. नाईक)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, दोंडाईचा

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी, खात्रीपूर्वक कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे/न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – | गणेश साईनाथ अहिरे |
| न्यायालयाचे नांव | – | दिवाणी व फौजदारी न्यायालय, दोंडाईचा. |
| दिनांक | – | ०९.०४.२०२६ |

सही/–
लघुलेखक (श्रेणी–३)